| | | | |
|---|---|---|---|
| **MHAH160005402023** | दाखल दिनांक | :– | ११.०४.२०२३ |
| | नोंदणी दिनांक | :– | ११.०४.२०२३ |
| | निकाल दिनांक | :– | १०.०४.२०२६ |
| | कालावधी | :– | वर्ष महिने दिवस |
| | | | ०२ ११ ३० |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अकोले,</u>**
**<u>ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात</u>**
( पिठासीन अधिकारी अनंत रा. टेंगसे )
न्यायनिर्णय घोषीत दिनांक – १० एप्रिल, २०२६
(नियमित फौजदारी खटला क्र. ८४/२०२३) **निशाणी ४३**

गुन्हा नोंद क्रं. ५५९/२०२२, अकोले पोलीस स्टेशन, ता. अकोले.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>अकोले पोलीस स्टेशन, अकोले,<br>ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| अभियोग पक्षातर्फे | | विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता<br>श्रीमती. एस. ए. भोसले. |
| आरोपी | | **१. सिताबाई गणपत काळे,**<br>वय वर्ष – ४५,<br>**२. गणपत लहानु काळे,**<br>वय वर्ष – ५८,<br>**३. विशाल गणपत काळे,**<br>वय वर्ष – ३१,<br>सर्व रा. बहीरवाडी,<br>ता. अकोले, जि. अहमदनगर. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | | श्री. ए. के. धुमाळ. |

**भाग–ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | २९.११.२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | २९.११.२०२२ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | ११.०४.२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०३.०२.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :- | ११.०२.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | नाही. |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | १०.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :- | निरंक. |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रं. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सिताबाई गणपत काळे | नाही. | २२.०२.२०२४ | भा.द.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | गणपत लहानु काळे | नाही. | २२.०२.२०२४ | | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | विशाल गणपत काळे | नाही. | ०३.०२.२०२६ | | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग–क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्रं. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | गौरी विशाल काळे | फिर्यादी | २६ |

**क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा**

| अ.क्रं. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २७ | फिर्यादीवरील सही |
| २. | २८ | प्रथम खबरी अहवालावरील सही |
| ३. | २९ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | ३० | वैद्यकीय प्रमाणपत्र |

## न्या य नि र्ण य

**(दिनांक १०.०४.२०२६ रोजी घोषित केले)**

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द त्यांनी भारतीय दंड विधान (यापुढे थोडक्यात भा.द.वि. असे संबोधण्यात येईल) कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ नुसार गुन्हा केलेचे आरोपांबाबत चालविण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात पुढील प्रमाणे –**

**२.** दिनांक २९.११.२०२२ रोजी फिर्यादीचा मोठा मुलगा वेदांत आजारी असल्याने फिर्यादी त्यास अकोले येथे सरकारी दवाखान्यातुन औषधोपचार करुन दुपारी ०१:३० वाजता ती तिच्या बहिरवाडी येथील घरी गेली असता त्यावेळेस तेथे असलेले तिची सासु सिताबाई काळे, सासरे गणपत काळे, पती विशाल काळे यांनी तिला शिवीगाळ, दमदाटी करुन तु आमच्यापासून वेगळी का राहते असे म्हणुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावेळेस तिचा पती व तिची झटापट होवुन तिच्या मानेला ओढताण करुन दुखापत केली तसेच

त्यांच्या हातातील लाकडी काठीने तिच्या पाठीवर व पोटावर मारहाण केली. तसेच सासु सिताबाई काळे हिने तिला हाताचे चापटीने मारहाण करुन तिच्या गळ्यातील सोन्याची पोत तसेच कानातील तोडून नुकसान केले. त्यावेळेस फिर्यादी व तिचा मुलगा वेदांत यांनी मोठमोठ्याने आरडाओरड केली असता त्यावेळेस सर्व आरोपी हे तिला शिवीगाळ, दमदाटी करून जिवे ठार मारण्याची धमकी देत निघुन गेले. सदर घटनेबाबत तिने तिचा भाऊ सचिन भांगरे रा. मनोहरपुर, ता. अकोले याला फोन करुन सांगितल्याने त्यानंतर काही वेळाने तिचा भाऊ तेथे येवुन त्याचे बरोबर ती पोलीस स्टेशनला गेली व त्यावेळेस तिला सदर हाणामारी मध्ये मार लागला असल्याने तिला दवाखाना मेमो दिल्याने तिने औषधोपचार घेतल्यानंतर आरोपींविरूध्द सदरची फिर्यादी दिली.

**३.** फिर्यादीच्या फिर्यादीवरुन अकोले पोलीस ठाण्यात आरोपींविरुध्द गु.र.क्र. ५५९/२०२२ भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ अंतर्गत नोंदविण्यात आला. तपासी अंमलदार यांनी तपासदरम्यान साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदविले आणि इतर आवश्यक तो तपास केला. तसेच त्यांच्या तपासात आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आलेने त्यांनी आरोपींविरुध्द न्यायालयात भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ नुसार दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** आरोपी हजर झाल्यानंतर त्यांचेविरुध्द निशाणी २१ खाली भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ नुसार दोषारोप निश्चित केले. निशाणी २२ ते २४ वर आरोपींची जबानी नोंदविण्यात आली. आरोपींनी गुन्हा नाकबुल करून संपरिक्षेची मागणी केली.

**५.** अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत करण्याकरीता फिर्यादीची साक्ष नोंदवली. अभियोगपक्षाच्या साक्षीदाराने अभियोगपक्षास समर्थन दिले नाही व फिर्यादीने तिच्यामध्ये व आरोपींमध्ये आपसी तडजोड झाल्याचे पुराव्यामध्ये कथन केल्याने अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरावा मिळून न आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता (यापुढे थोडक्यात ''संहिता'' असे संबोधण्यात येईल) कलम ३१३(१)(ब) चे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांचा युक्तीवाद ऐकला. एकंदर संचिकेतील कागदपत्रे व पुरावे बघता माझे निष्कषार्थ खालील मुद्दे निघतात. त्याचे उत्तरे मी कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे दिली आहेत.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | आरोपींनी संगनमताने दिनांक २९.११.२०२२ रोजी दुपारी ०१:३० वाजताचे सुमारास मौजे बोरी, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे आरोपी क्र. ३ याने फिर्यादीला लाकडी काठीने पाठीवर व पोटावर मारहाण करून इच्छापुर्वक जखमी केले, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| **२.** | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीला लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक जखमी केले, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| **३.** | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य गुन्हा घडावा या उद्देशाने जाणीवपुर्वक शिवीगाळ | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| | करुन तिला प्रक्षोभीत केले, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| ४. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादीस जीवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दिला, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ५. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे गळ्यातील पोत तसेच कानातील तोडून नुकसानीस कारणीभूत ठरली, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ६. | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने गुन्हा करतेवेळी वापरलेले हत्यार लाकडी काठीची ती पुरावा असतानाही विल्हेवाट लावली, असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ७. | आदेश काय ? | **अंतिम आदेशा–प्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ६ करीता**

७. आरोपीवर लादलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षाने अभिलेखावर फिर्यादी गौरी विशाल काळे (स.सा.क्र.१) यांची साक्ष निशाणी २६ वर नोंदवली.

८. फिर्यादी गौरी विशाल काळे (स.सा.क्र.१) हिने तिच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, घटना अंदाजे २ वर्षापुर्वी सकाळी

१२:३० वाजता बहिरवाडी येथे त्यांच्या घरी घडली होती. त्यावेळी तिच्यामध्ये व आरोपींमध्ये किरकोळ वादावादी झाली होती. या व्यतिरीक्त काही घडले नव्हते. रागाच्या भरात तिने आरोपींविरूध्द फिर्याद दिली होती. फिर्यादीने तिची फिर्यादीवरील व छापील प्रथम खबर अहवालावरील सही (अनुक्रमे निशाणी २७ व २८) वगळता उर्वरित सर्व मजकूर नाकारला.

**९.** सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्षाने सदर साक्षीदाराची सखोल उलटतपासणी घेतली परंतु, अभियोगपक्षास पुरक बाबी अभिलेखावर आल्या नाहीत. तसेच सदर साक्षीदाराने तिच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, तिच्यामध्ये व आरोपींमध्ये न्यायालयाच्या बाहेर आपसांत तडजोड झालेली आहे.

**१०.** अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे विवेचन केले असता दिनांक २९.११.२०२२ रोजी दुपारी ०१:३० वाजता आरोपींनी लाकडी काठीने फिर्यादीच्या पाठीवर व पोटावर मारहाण केली तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली, जिवे मारण्याची धमकी दिली तसेच तिच्या गळ्यातील सोन्याची पोत व कानातील तोडून नुकसानीस कारणीभूत ठरले व गुन्हा करतेवेळी वापरलेले हत्यार लाकडी काठीची विल्हेवाट लावली याबाबतचा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. आरोपींनी अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा (निशाणी २९) व वैद्यकिय प्रमाणपत्र (निशाणी ३०) कबुल केले असले तरी त्या कबुलीस निर्णायक पुरावा म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींविरुध्दचे दोषारोपातील आरोप सिध्द झाले आहेत असे म्हणता येणार नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ ते ६ चे उत्तर नाही असे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ७ करीता</u>**

**११.** मुद्दा क्रमांक १ ते ६ वरील निष्कर्षावरुन आरोपी हे निर्दोष

मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच सदर न्यायनिर्णयाविरुध्द अपिल किंवा इतर कारवाईमध्ये हजर राहण्याकरीता आरोपींनी जामिन दिलेला आहे. सबब, मुद्दा क्र. ७ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

| **आदेश** | |
|---|---|
| १. | आरोपींना भा.द.वि.चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ४२७, २०१ सहकलम ३४ या कलमांअंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयांतून संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपींचे जामिन कदबे व बंधपत्रे याद्वारे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींनी संहितेचे कलम ४३७–अ नुसार दिलेले जामिन हे पुढील सहा महिन्याच्या कालावधीपर्यंत वैध राहतील. |
| ४. | आरोपींना मुक्त करण्यात येते. |
| | न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला. |

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.04.10 17:42:05 +0530

दिनांक १०/०४/२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेश/न्यायनिर्णयाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | शैलेश पोपट पालवे,<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | श्री. अनंत रा. टेंगसे,<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>कोर्ट नं. २, अकोले. |
| आदेश/न्यायनिर्णय दिनांक | – | १०/०४/२०२६ |
| न्यायदंडाधिकारी सही | – | १०/०४/२०२६ |
| आदेश/न्यायनिर्णय अपलोड दिनांक | – | १०/०४/२०२६ |